# पंतप्रधानांच्या मुलाखतीने पितळ उघडे पडले
# आता ठाकरे बंधू मर्दानगी दाखविणार का?

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे**

नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी पंतप्रधान मोदी यांची प्रदीर्घ मुलाखत सर्व वाहिन्यांवर एकही ब्रेक न घेता प्रक्षेपित करण्यात आली. यावरून तीन बाबी स्पष्ट झाल्या. भयभीत भाजपाने त्वरेने प्रचार सुरू केला आहे. सर्व वाहिन्यांवर विनाब्रेक मुलाखत दाखविली म्हणजे भाजपा प्रचारासाठी प्रचंड पैसा ओतण्याच्या तयारीत आहे. तिसरी आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे भाजपाच्या चुकीच्या धोरणांचे पितळ या मुलाखतीने सर्वांसमोर उघडे पडले आहे.

यानंतर भाजपा काय करणार हा प्रश्न उरलेला नाही. आपल्या चुका कशा बरोबर आहेत हे पुढील १०० दिवसांत शंभर वेळा सांगून संभ्रम निर्माण करायचा इतकेच भाजपा करू शकते. त्यामुळे भाजपाची रणनीती ठरली आहे. आता प्रश्न इतर पक्षांच्या भूमिकेचा आहे. भाजपाचे पितळ उघडे पडल्याने त्यांना आता भूमिका घ्यावी लागेल आणि यातच त्यांची सर्वात मोठी अडचण आहे.

महाराष्ट्रात भाजपा सोडून चार महत्त्वाचे पक्ष आहेत. त्यापैकी सर्वात कमकुवत इंजिनाबद्दल आधी बोलूया. प्रत्येक निवडणुकीवेळी कोणता न कोणता पक्ष इंजिनात इंधन टाकून ते रुळावर आणतो आणि धनुष्यबाणाच्या दिशेने इंजिन सोडून दिले जाते. या वेळीही तेच घडणार आहे. धनुष्यबाणाला छुपी साथ देऊन इंजिन भाजपाच्या अंगावर जाईल अशी आशा करणे अतिधाडसाचे ठरेल. राष्ट्रवादी काँग्रेस हा दुसरा पक्ष भरवशाचा नाही. हा मातीचा खेळ खेळणारा मल्ल असला तरी मातीशी एकनिष्ठ नाही. त्यामुळे या पक्षाचा प्रवाह काळच ठरवील. काँग्रेस पक्षाची एकूण ताकद वाढत असली तरी महाराष्ट्रातील नेत्यांचे आपसांत इतके वैर आहे की, हे वैरच पक्षाचा घात करायला पुरेसे आहे.

आजच्या स्थितीत महाराष्ट्रात केवळ शिवसेनाच टक्कर देऊ शकते. परंतु उद्धव ठाकरे यावेळी टक्कर देण्याची मर्दानगी दाखवतील की सत्तेचा अर्धा वाटा मागण्यापुरते दंड थोपटतील हा प्रश्न आहे. भाजपाच्या विरोधात वातावरण तयार करताना शिवसेनेने प्रामुख्याने दोन मागण्या केल्या आहेत. पहिली मागणी म्हणजे शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि दुसरी मागणी म्हणजे न्यायालयाच्या निकालासाठी न थांबता अध्यादेश काढून श्रीराम मंदिराची उभारणी ताबडतोब सुरू व्हावी. राममंदिराच्या मुद्यावर उद्धव ठाकरे यांनी अयोध्या दौरा करून मुठीही आवळल्या. पण पंतप्रधान मोदींनी नववर्षाच्या पहिल्याच मुलाखतीत शिवसेनेच्या दोन्ही मागण्या पूर्ण फेटाळून लावल्या. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यास साफ नकार देत काँग्रेस फसव्या कर्जमाफीचे लॉलीपॉप दाखवत आहे, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर अयोध्येतील राममंदिर हे न्यायालयीन प्रक्रियेच्या नुसारच बांधले जाणार असून अध्यादेश काढणार नाही हेही पंतप्रधानांनी सांगितले. भाजपाने त्यांची भूमिका स्पष्ट केली. आता प्रश्न असा आहे की, शिवसेना यावर काय निर्णय घेणार आहे? आरोळ्या ठोकणारा वाघ झेप घेणार की गुहेत जाऊन निपचित पडणार हा खरा प्रश्न आहे.

पंतप्रधानांची मुलाखत झाल्यावर नेहमीप्रमाणे घडते तेच घडले आहे. उद्धव ठाकरे यांनी या मुलाखतीवर प्रतिक्रिया देण्यापूर्वी अतिउतावीळ संजय राऊत यांची प्रतिक्रिया आली. संजय राऊत यांनी ट्विट केले की, राममंदिरासाठी अध्यादेश काढणार नाही याचा अर्थ प्रभू श्रीराम हे न्यायापेक्षा मोठे नाहीत, असेच भाजपाने सांगितले आहे. पण ही इतकी ट्विट देऊन शिवसेना गप्प बसणार का हा सवाल आहे. भाजपा प्रभू श्रीरामाला किती महत्त्व देते हे कळले आहे. यानंतर शिवसेना छाती फाडून प्रभू श्रीरामाबद्दलचे प्रेम दाखविणार की स्वत:चे खिसे आणि खिशातील राजीनामे सुरक्षित ठेवणार आहे? शिवसेनेचा कायम एकच युक्तिवाद असतो की, शिवसेनेने सरकारचा पाठिंबा काढून घेतला की राष्ट्रवादी पाठिंबा देऊन सरकारमध्ये सामील होईल. या युक्तिवादात नेमके दु:ख कशाचे आहे? सत्तेचे लोणी हातून जाईल याचे दु:ख आहे की बाहेर राहून सरकार पाडण्याइतकी आपली ताकद नाही याचे दु:ख आहे? कर्जमाफी झालीच पाहिजे आणि राममंदिराचा अध्यादेश निघालाच पाहिजे या गर्जना राष्ट्रवादीच्या नव्हेत. या गर्जना शिवसेनेच्या आहेत. तेव्हा या गर्जनेसाठी सत्तेतून बाहेर पडण्याची जबाबदारीही शिवसेनेचीच आहे. शिवसेनेने निर्णय घेण्याचा क्षण आला आहे. नववर्षाच्या पहिल्या मुलाखतीत भाजपाचा मुखवटा गळून पडला. आता शिवसेनेचे खरे रूप लोकांसमोर येण्याची वेळ आली आहे.

